# मोनो, मेट्रो आणि उपनगर रेल्वे स्थानक 'वॉक-वे'ने जोडणार

## मोनो रेल्वेचे प्रवासी वाढवण्याचा एमएमआरडीएचा प्रयत्न; ६२ कोटी रुपये खर्च अपेक्षित

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मोनो रेल्वेला उर्जितावस्था प्राप्त करून देण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून मोनो रेलचे जेकब सर्कल स्थानक आणि मेट्रो ३ तसेच महालक्ष्मी उपनगरीय रेल्वे स्थानकाला 'वॉक-व'च्या माध्यमातून जोडण्यात येणार आहे.

हा वॉक-वे सरकता असेल. त्यामुळे प्रवाशांना मोनो जेकब सर्कल, मेट्रो ४ आणि महालक्ष्मी या दरम्यान ये-जा करणे सुलभ जाईल. या वॉक-वेसाठी ६२ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून बांधकाम ऑगस्ट २०२३ पर्यंत पूर्ण करून वॉक-वे प्रवाशांसाठी खुला करण्याचे उद्दिष्ट आहे.या प्रकल्पासाठी पुढील आठवड्यात निविदा काढल्या जाणार आहेत. जेकब सर्कल,मेट्रो ३-चे स्थानक आणि उपनगरीय या दरम्यानचे अंतर ४१५ मीटर आहे. वॉक-वे माध्यमातून हे तिन्ही मार्ग जोडले जातील.

मोनोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोनोतून उतरून अन्य ठिकाणी जाण्यासाठी अन्य मेट्रो मार्गांचा वापर करावयाचा असेल, तर स्थानकाबाहेर येण्याची गरज भासणार नाही. वाहतुकीच्या अन्य मार्गांचा पर्याय उपलब्ध झाल्याने मोनोचे प्रवासी वाढतील,अशी एमएमआरडीएला अपेक्षा आहे.

● मोनोची प्रवासी संख्या वाढावी म्हणून एमएमआरडीए जंगजंग पछाडत आहे. परंतु प्रवासी संख्या वाढली नाही. मोनोचा ताफ्यात जास्तीत जास्त ट्रेन याव्यात म्हणूनही प्रयत्न सुरू आहेत. मात्र नव्या ट्रेन येण्यास अजून बराच कालावधी आहे.त्यामुळे एमएमआरडीए विविध पर्यायांची चाचपणी करत आहे.